**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग**
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email : collector_raigad@maharshtra.gov.in Email-tahasildarmahasul@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. ७ /०४/२०२०

प्रति,
मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

**विषय :- कोव्हीड-१९ या विषाणूचा उपचारासाठी जिल्हानिहाय निर्धारीत केलेल्या रुग्णालयाबाबत.**

**संदर्भ :-** १) आपलेकडील पत्र क्र.मशा/कार्या-२/कोवीड-१९/रुग्णालय/२०२० दि.३/०४/२०२०.
२) जिल्हा शल्यचिकीत्सक रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र जा.क्र.जिशचि/कार्या-६/कोरोना विषाणू/उजिरु/५३५१-५२ दि.३/०४/२०२०.
३) वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, पनवेल यांचेकडील पत्र जा.क्र.उजिरुप/आस्था/कोरोना/खाटा सुसज्ज/स्थिती/४९६-९९/२०२० दि.३/०४/२०२०.

महोदय,

शासन अधिसूचना क्र.संआसे/करोना/कक्ष-५८/२०२० दि.३१/०३/२०२० मधील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या खाटांची (बेड) संख्या तसेच इतर सोयी सुविधा २४ तासांमध्ये परिपूर्ण करण्याबाबत तसेच सदर यादीतील कोवीड-१९ रुग्णालय कोणत्याही क्षणी वापरण्यासाठी योग्य असल्याचे प्रमाणित करुन सदरची माहिती सादर करणेबाबत संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये आपण या कार्यालयास कळविले आहे.

कोविड-१९ या विषाणूचा उपचारासाठी रायगड जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालय पनवेल ही आरोग्य संस्था निर्धारीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर १०० खाटांचे रुग्णालय कोरोना उपचारासाठी साधन सामुग्रीने सुसज्ज करण्यात येत आहे. तथापी सदर ठिकाणी १० व्हेंटिलेटर स्थापित करण्याचे कामकाज सुरु असून येत्या ०२ दिवसात ते कार्यान्वीत होतील. तसेच सद्यस्थितीत पीपीएफ १०० नग व एन ९५ मास्क २०० नग व ट्रीपल लेअर मास्क २००० नग आहेत. तसेच आवश्यक असणारी औषधांची मागणी विविध व्हेन्डर्स यांचेकडे केली असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांनी या कार्यालयास कळविले आहे. तसेच MGM रुग्णालय पनवेल येथे १०० खाटांचे Isolation Ward Covid -१९ साठी सुरु असून इच्छुक रुग्ण तेथील खाजगी उपचार घेत आहेत. तेथे ICU मध्ये २० Bed असून ५ व्हेंटीलेटर Covid -१९ च्या उपचारासाठी उपलब्ध आहेत.

कोविड-१९ या विषाणूचा उपचारासाठी रायगड जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालय पनवेल हे १०० खाटांचे रुग्णालय आवश्यक त्या साधन सामुग्रीने सुसज्ज करण्यात आले आहे तेथे सद्यस्थितीत ६ Covid -१९ Positive रुग्ण दाखल आहेत व ICU साठीच्या इतर सोयीसुविधा पुढील २४ तासांमध्ये परिपूर्ण करण्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना कळविण्यात आले आहे. करीता अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

आपली विश्वासू,

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**